
23-02-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 02/22/2025 11:34 PM Page 1




फोंडा परिसरात वन्य प्राण्यांचा वाढता संचार » पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



ऑस्ट्रेलियाचा इंग्लंडवर वनडेतील ऐतिहासिक विजय » पान ४ वर

वेर्णा, रविवार, २३ फेब्रुवारी २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 171 | Verna, | facebook.com/dainikherald | Sunday 23 February 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### बुलेटची वीज खांब्याला धडक दुचाकीस्वार ठार

टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि.२२ : नुवे येथे वाहतूक बेटाजवळ बुलेट एनफिल्डची धडक रस्त्याच्या बाजूच्या विजेच्या खांब्याला बसून झालेल्या अपघातात दुचाकीस्वार ठार झाला तर सोबत असलेली महिला जखमी झाली. अपघातात रामदयाल चव्हाण (डोंगरी वास्को द गामा, खारेवाडा, वास्को) हा ठार झाला. स्नेहा एलीपरभाथा या जखमी झाल्या.
अपघातानंतर मयताच्या मृतदेहाचे शवविच्छेदन केले असता त्याच्या डोक्याला, छातीला जबर मार लागल्याने मृत्यू ओढवल्याचे पुढे आले आहे. मृतदेह कुटुंबाच्या ताब्यात देण्यात आला. यासंदर्भात मायणा–कुडतरी पोलिस स्थानकाचे उपनिरीक्षक सागर कामत अधिक तपास करीत आहेत.

---

### चीनमध्ये आढळला नवा कोरोना

वुहान, दि. २२ :वर्ष २०१९ मध्ये चीनमध्ये आढळलेल्या कोरोना व्हायरसने वर्ष 2020 मध्ये संपूर्ण जगभराता हाहाकार माजवला होता. चीनसह जगभरातील नागरिकांना कोरोनाची लागण झाल्यानं क्वारंटाइन व्हावं लागत होतं. मात्र, दिवसाला रुग्णांची संख्या हजारोंनी वाढत असल्याने रुग्णालयातही जागा शिल्लक नव्हती. परिणामी अनेकांना आपला जीव गमवावा लागला होता. भारतातही या कोरोना व्हायरसमुळे अनेकांना आपला जीव गमवावा लागला. मात्र, आरोग्य विभागाकडून निर्माण करण्यात आलेल्या कोरोना लसीमुळे या व्हायरसवर नियंत्रण मिळवणं शक्य झाले. परंतु, असाच कोरोना व्हायरस पुन्हा एकदा चीनमध्ये आढळला आहे. विशेष म्हणजे हा व्हायरस जनावरांच्या संसर्गातून होत असल्याची माहिती समोर येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, चीनमधील एका टीमला नवा कोरोना व्हायरस सापडला आहे.

---

### पंतप्रधान प्रधान सचिवपदी शक्तिकांत दास यांची नियुक्ती

नवी दिल्ली, दि. २२ : रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे माजी गव्हर्नर शक्तिकांत दास यांची पंतप्रधान मोदींचे प्रधान सचिव–२ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. कॅबिनेट नियुक्ती समितीने शनिवारी ही नियुक्ती केली. समितीचे सचिव मनीष सक्सेना यांनी नियुक्तीबद्दल माहिती दिली. शक्तीकांत दास १० डिसेंबर रोजी आरबीआय गव्हर्नर पदावरून निवृत्त झाले. २२ फेब्रुवारी रोजी त्यांची पंतप्रधानांचे प्रधान सचिव म्हणून नियुक्ती झाली. म्हणजेच, निवृत्तीनंतरच्या ७५ व्या दिवशी ते पंतप्रधान कार्यालयात एका महत्त्वाच्या पदावर पोहोचले. सध्या, पीके मिश्रा पंतप्रधान मोदींचे प्रधान सचिव म्हणून पहिल्या क्रमांकाचे पद भूषवत आहेत. शक्तिकांत दास दुसऱ्या क्रमांकावर असतील. दास हे १९८० च्या बॅचचे तामिळनाडू कॅडरचे आयएएस अधिकारी आहेत. तर मिश्रा हे गुजरात केडरचे निवृत्त अधिकारी आहेत.

---

### पाकच्या तुरुंगातून २२ जणांची सुटका

कराची, दि. २२ : पाकिस्तानातील कराची येथील मालीर तुरुंगात असलेल्या २२ भारतीय मच्छिमारांची सुटका करण्यात आली आहे. मालीर तुरुंगाचे अधीक्षक अर्शद शाह यांनी मच्छिमारांना त्यांची शिक्षा पूर्ण झाल्यानंतर सोडण्यात आल्याचे सांगितले. त्यानुसार शनिवारी त्यांना भारताच्या स्वाधीन केले.

### हवामान

कमाल : २८ किमान : २३
आर्द्रता : ७४

### बाजार भाव

सोने : ₹ ८८,७८० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ १,००,१०० १ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५ .७७↑ (२३१.१६ )
निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)

# सरकारच्या दडपशाही विरोधात लढ्याचा इशारा

## कार्यकर्ते रामा काणकोणकर यांना सशर्त जामीन मंजूर

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. २२ : मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्याविरोधात वक्तव्य केल्याच्या कारणावरून अटक करण्यात आलेल्या कार्यकर्ते रामा काणकोणकर यांना शनिवारी संध्याकाळी उशिरा सशर्त जामीन मंजूर करण्यात आला. मात्र, त्यांच्या अटकेनंतर राज्यात कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संताप दिसून आला असून, सरकारच्या दडपशाही विरोधात एकजूट होण्याचा निर्धार करण्यात आला आहे.**

काणकोणकर यांच्या समर्थनार्थ कार्यकर्ते आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी सरकारच्या कुशासनाविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. त्यांनी या प्रकाराला लोकशाही विरोधी म्हणत मोठ्या आंदोलनाचा इशारा दिला आणि सर्व गोवेकरांसाठी न्याय मिळवण्याचा निर्धार व्यक्त केला. शनिवारी, पणजी पोलिस ठाण्याबाहेर जमलेल्या कार्यकर्त्यांनी काणकोणकर यांच्या अटकेबाबत खुलासा मागितला. त्यांच्या प्रकृतीबाबत कोणतीही माहिती न मिळाल्याने कार्यकर्त्यांनी पोलिसांकडे संतप्त स्वरात उत्तरं मागितली.

अ‍ॅड. प्रतिमा कुतिन्हो यांनी सरकारच्या कृतीवर टीका करताना सांगितले, काणकोणकर यांची अटक नियोजनबद्ध होती, जेणेकरून त्यांची



पणजी : काणकोणकर यांचे कुटुंबीय आणि कार्यकर्ते.

सुटका लांबवता येईल. परंतु लोकशाहीत कोणीही जनतेचा आवाज दडपू शकत नाही. हा लढा फक्त रामासाठी नाही, तर सर्व गोवेकरांच्या न्यायासाठी आहे. कार्यकर्ते राजन घाटे यांनीही याला विरोध दर्शवला. त्यांनी सांगितले, हा सरकारचा आवाज दडपण्याचा प्रयत्न आहे. पण जितका दबाव आणला जाईल, तितका आमचा निर्धार मजबूत होईल. गोवेकर एकत्र येऊन सरकारच्या मनमानी कारभाराविरोधात लढा उभारतील. कोंकणी भाषा मंडळाच्या माजी अध्यक्षा अन्वेषा सिंगबाल यांनी या घटनेला लोकशाहीविरोधी ठरवले. त्या म्हणाल्या, लोकशाहीत

पान २ ▶

# मराठी – कानडी वाद पुन्हा भडकण्याची शक्यता

मुंबई, दि. २२ : कर्नाटकमधील चित्रदुर्ग येथे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एमएसआरटीसी) बसवर झालेल्या हल्ल्यानंतर, महाराष्ट्राचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शनिवारी कर्नाटकला जाणाऱ्या सर्व राज्य परिवहन बससेवा तत्काळ बंद करण्याचे आदेश दिले.शुक्रवारी रात्री ९.१० च्या सुमारास बेंगळुरूहून मुंबईला जाणाऱ्या एमएसआरटीसी बसवर चित्रदुर्ग येथे कन्नड समर्थक कार्यकर्त्यांनी हल्ला केला. या हल्ल्यात चालक भास्कर जाधव यांच्या चेहऱ्यावर काळे फासण्यात आले तसेच त्यांच्यावर मारहाण करण्यात आली. या घटनेनंतर कर्नाटक पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले की, जोपर्यंत कर्नाटक सरकार या मुद्द्यावर आपली भूमिका स्पष्ट करीत नाही, तोपर्यंत कर्नाटकला जाणारी राज्य परिवहन बससेवा पुन्हा सुरू केली जाणार नाही. त्याच दिवशी, कर्नाटकमधील बेळगावी येथे कर्नाटक राज्य परिवहन महामंडळाच्या बस कंडक्टरवर हल्ला करण्यात आला. या हल्ल्याचे कारण म्हणजे कंडक्टरने एका मुलीला मराठीत उत्तर दिले नाही. या प्रकरणी चौघांना अटक करण्यात आली असून, पीडित कंडक्टरवरही पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ५१ वर्षीय कंडक्टर महादेवप्पा मल्लप्पा हुक्केरी यांनी सांगितले की, सुलेभावी गावात एका मुलीने मराठीत संवाद साधण्याचा प्रयत्न केला. मी तिला मराठी येत नसल्याचे सांगितले आणि कन्नडमध्ये बोलण्यास सांगितले. त्यावर तिने मला शिवीगाळ केली आणि अचानक मोठ्या जमावाने माझ्यावर हल्ला केला.

या हल्ल्यात जखमी झालेल्या कंडक्टरला बेळगाव इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस येथे दाखल करण्यात आले असून, त्याची प्रकृती स्थिर असल्याचे पोलिसांनी सांगितले. कंडक्टरवर झालेल्या हल्ल्यातील चार आरोपींना अटक करण्यात आली असून, उर्वरित आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत.

या संपूर्ण घटनेमुळे महाराष्ट्र–कर्नाटक सीमावर्ती भागात तणाव निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कन्नड समर्थक कार्यकर्त्यांनी बेळगावी–बागलकोट महामार्ग रोखून निषेध नोंदवला तसेच पुतळे जाळून संताप व्यक्त केला. यावर प्रतिक्रिया देताना पोलिस आयुक्त इयाडा मार्टिन मारबानियांग यांनी सांगितले की, या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून, कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यास प्राधान्य दिले जाईल.

# दिल्लीच्या पर्यटकाने महिलेला चिरडले ; खुनाचा गुन्हा दाखल

▶ मांद्रे येथील घटनेने परिसर हादरला ; स्थानिकांमध्ये संताप

■ *टीम दैनिक हेराल्ड*

मांद्रे, दि. २२: दिल्लीतून आलेल्या दीपन राजू बत्रा (२३) याने आपल्या वाहनाने ६५ वर्षीय मेरी फेलिझ फर्नांडिस यांना उडवत १० मीटर फरफटत नेले, ज्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. मांद्रे येथील जूनसवाडा भागात घडलेल्या या घटनेने संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली असून, पोलिसांनी संशयिताविरोधात खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

ही घटना २१ फेब्रुवारी रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास मांद्रे येथील जूनसवाडा भागात घडली. दीपन बत्रा हा आपल्या कुटुंबासोबत गोव्यात सुट्टीसाठी आला होता आणि मांद्रेच्या सावंतवाडा परिसरातील निकिता गेस्टहाऊस येथे वास्तव्यास होता. तो नियमितपणे आपल्या दोन कुत्र्यांसह समुद्रकिनारी जात असे. मात्र, या कुत्र्यांमुळे स्थानिक



रहिवासी, विशेषतः मेरी फर्नांडिस यांना त्रास होत होता, कारण त्यांच्याही मालकीचे दोन कुत्रे होते.

या कुत्र्यांमध्ये वारंवार वाद होत असल्याने मेरी फर्नांडिस यांनी बत्राला कुत्रे न आणण्याची विनंती केली होती. त्यावरून दीपन बत्रा आणि त्याच्या आईने त्यांच्याशी भांडण केले होते. त्यानंतर रात्री दीपनने आपल्या डीएल ४सी बीसी २५७६ या चारचाकी वाहनाने अतिवेगाने येत मेरी फर्नांडिस यांना उडवले आणि काही मीटर फरफटत नेले. अपघाताची ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे . घटनेनंतर नागरिकांनी त्वरित मांद्रे पोलिसांना माहिती दिली. महिलेला उडवल्यानंतर दीपन बत्रा थेट पोलिस स्थानकात हजर झाला . पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला असून, बीएनएस कलम १०३ आणि २८१ अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करत दीपन बत्रा याला अटक केली आहे.

गोवा हे पर्यटकांचे आवडते ठिकाण असले तरी काही पर्यटकांकडून स्थानिकांवरील दादागिरी वाढली आहे. मेरी फर्नांडिस या गरीब कुटुंबातील असून, त्या समुद्रकिनारी शहाळी विकून उदरनिर्वाह करत होत्या. त्यांच्या मृत्यूनंतर स्थानिक रहिवाशांनी प्रशासनाकडे अशा बेजबाबदार पर्यटकांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. मांद्रे पंचायतीचे सदस्य रॉबर्ट फर्नांडिस यांनी देखील दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. संशयित दीपन बत्रा याच्या वास्तव्याची सखोल चौकशी सुरू असून, तो येथे काय उद्देशाने आला होता, तो कुठे राहत होता याचा तपास मांद्रे पोलिस निरीक्षक शेरीफ जॅकीस यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. पोलिसांनी आरोपीचे वाहनही जप्त केले आहे.

# तरुण चालकाने उद्ध्वस्त केले कुटुंब ; पोलिसांवर आरोप

ऑगस्टो रॉड्रिग्ज
टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. २२ :** मर्सिडीज कार चालवणाऱ्या २१ वर्षीय युवकाने एका संगीत शिक्षिकेला धडक देऊन तिचे संपूर्ण आयुष्य उद्ध्वस्त करून टाकले. या अपघातामुळे तिचे कुटुंब हादरले असून, पोलिसांनी निष्काळजीपणा दाखवल्याचा आरोप पीडितेच्या नातेवाईकांनी केला आहे.

संगीत शिक्षिका ज्युडिथ फर्नांडिस आपल्या पतीला घरी लवकर पोहोचण्याचे आश्वासन देत फोन करून निघाली होती. मात्र, काही क्षणांतच तिच्या आयुष्यात भयाण वळण आले. अंकित सांगेलकर या तरुणाने शेजाऱ्याकडून घेतलेल्या मर्सिडीज कारने तिला जोरदार धडक दिली आणि तो घटनास्थळावरून पळून गेला.या दुर्घटनेत ज्युडिथ यांना गंभीर दुखापत झाली. त्यांच्या डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, त्यांचे माकडहाड आणि पेल्विस फ्रॅक्चर झाले असून, पूर्णपणे बरे होण्यासाठी अनेक महिने लागतील.

पीडितेचे पती प्रजय सिमपुरष्कर यांनी सांगितले की, आमच्या लग्नाला केवळ तीन महिने झाले होते. आमच्याकडे मोठी स्वप्ने होती, पण एका बेपर्वा चालकाने सगळे उध्वस्त केले.अपघाताची बातमी मिळताच प्रजय घटनास्थळी धावले. ती रक्ताच्या थारोळ्यात पडलेली होती. मला आठवते, तिने कुजबुजत मला सांगितले, 'सगळं संपलं.' त्या क्षणी माझ्या आयुष्यातील सर्व संगीत थांबले, असे ते भावुक होत म्हणाले.

या प्रकरणात पोलिसांवर निष्काळजीपणाचा आणि आरोपीच्या कुटुंबाची बाजू घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. माझ्या पत्नीला चिरडणाऱ्या मुलाच्या पालकांना पोलिस अधिकाऱ्याच्या केबिनमध्ये बसण्याची संधी देण्यात आली, तर मला मात्र बाहेर उभे रहायला सांगितले गेले, असे प्रजय यांनी सांगितले.

ज्युडिथच्या भावानेही पोलिसांवर गंभीर आरोप केले. आरोपीला तात्काळ अटक करणे अपेक्षित होते, मात्र पोलिसांनी त्याला जामिनावर सोडले. पीडितेच्या कुटुंबाला आधार देण्याऐवजी त्यांनी आरोपीचे संरक्षण केले, असे त्यांनी नमूद केले.

सध्या ज्युडिथ अतिदक्षता विभागात उपचार घेत आहे. ती अजूनही प्रचंड वेदना सहन करत असून, तिच्या कुटुंबीयांसाठी हा संघर्ष संपलेला नाही. आम्ही आमच्या विश्वासावर ठाम आहोत. एक दिवस सत्य समोर येईल आणि न्याय मिळेल, असे प्रजय यांनी सांगितले. या अपघातामुळे पुन्हा एकदा वाहतुकीच्या सुरक्षेचे आणि पोलिस प्रशासनाच्या कार्यपद्धतीचे प्रश्न उपस्थित झाले आहेत. प्रशासनाने या प्रकरणात निष्पक्ष आणि कठोर भूमिका घेतली पाहिजे, अशी मागणी ज्युडिथच्या कुटुंबियांनी केली आहे.

# हणजूण परिसरात चार महिन्यांपासून तीव्र पाणीटंचाई

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**हणजूण, दि. २२ :** येथील वळझरवाडा परिसरातील रहिवाशांना मागील चार महिन्यांपासून तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून, दैनंदिन गरजा भागवण्यासाठी त्यांना पूर्णतः खाजगी पाण्याच्या टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. प्रशासनाकडून दिलेले आश्वासन पूर्ण न झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

रहिवाशांच्या मते, गेल्या वर्षी ऑक्टोबरपासून सरकारी पाणीपुरवठा पूर्णतः बंद झाला आहे. पूर्वी दोन दिवसांआड पाणीपुरवठा होत असला तरी आता तोही थांबला आहे. स्थानिक प्रशासनाने नवीन पाईपलाईन टाकल्यानंतर जानेवारीपासून पुरवठा सुरळीत होईल, असे आश्वासन दिले होते. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. स्थानिकांना शंका आहे की,



घरगुती पाणीपुरवठा व्यावसायिक आस्थापनांकडे वळवला जात आहे.

टॅक्सीचालक संतोष ताम्हणकर यांनी सांगितले की, गेल्या तीन महिन्यांपासून आमच्या भागात पाणीपुरवठा झालेला नाही. फेब्रुवारीपर्यंत नवीन पाईपलाईन टाकली जाईल, असे सांगण्यात आले होते. मात्र, महिन्याच्या शेवटच्या टप्प्यात येऊनही पुरवठा सुरू झालेला नाही. स्थानिक हॉटेल्स आणि व्यावसायिक आस्थापनांना नियमित पाणीपुरवठा केला जात असताना आम्हाला मात्र खाजगी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. सकाळी कमी दाबाने पाणी सोडले जाते, मात्र पुरवठा थांबण्यापूर्वी आम्हाला फक्त चार ते सहा बादल्या भरता येतात.

स्थानिक रहिवासी शांती गोवेकर यांनीही पाणीटंचाईमुळे होणाऱ्या त्रासाबद्दल नाराजी व्यक्त केली. त्यांनी सांगितले, गेल्या वर्षभरात पाणीपुरवठा अत्यंत अनियमित आहे, तरीही मला ३,००० रुपयांचे पाणी बिल पाठवले गेले. मी बिल भरण्यास नकार दिला आहे, कारण मला माझ्या गरजा भागवण्यासाठी खाजगी टँकरमधून पाणी विकत घ्यावे लागत आहे. स्थानिक प्रशासनाकडे विचारणा केल्यास वॉर्ड सदस्य उलट टोमणे मारतात.

ज्येष्ठ नागरिक रुडाल्फ डिसोझा यांनी सांगितले की, गेल्या तीन महिन्यांपासून आम्ही अतोनात त्रास सहन करत आहोत. घरगुती पाणीपुरवठा बंद असताना व्यावसायिक आस्थापनांना मात्र नियमित पाणी मिळत आहे. मोठ्या पंपांसह बोअरवेल्स खोदल्या जात आहेत, त्यामुळे स्थानिक रहिवाशांना पुरेसा पाणीपुरवठा मिळत नाही. ग्रामसभेत हा मुद्दा उपस्थित केला असला तरी प्रशासनाकडून कोणतीही कारवाई झालेली नाही.

स्थानिक रहिवासी एरेन्सिया पिंटो यांनी सांगितले की, पूर्वी आलटून पालटून पाणी मिळत असे, मात्र गेल्या पाच महिन्यांपासून तेही बंद झाले आहे. मी टँकर मागवू शकत नाही, त्यामुळे मला शेजाऱ्याच्या विहिरीचे पाणी वापरावे लागते.

एलिझा पिंटो यांनी सांगितले की, गेल्या नोव्हेंबरपासून आमच्या भागातील पाणीपुरवठा कमी झाला आहे. आता टँकरद्वारे पाणी खरेदी करावे लागते, ज्यासाठी दरवेळी १२०० रुपये खर्च येतो.

पाणीटंचाईमुळे त्रस्त असलेल्या अनेक गृहिणींनी संताप व्यक्त केला. त्यांनी सांगितले की, पाणी मिळेल या भीतीने त्यांना झोपेतून उठावे लागते. आम्ही अन्नाशिवाय राहू शकतो, पण पाण्याशिवाय नाही, असे एका महिलेने सांगितले. दरम्यान, हणजूण – कायसूव वॉर्ड पाचच्या सदस्या प्रतिमा गोवेकर यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांना रहिवाशांकडून कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नसल्याचा दावा केला. मात्र, नागरिकांच्या वाढत्या रोषामुळे प्रशासनाने त्वरित लक्ष घालून उपाययोजना करणे गरजेचे आहे.